**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २९५/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.कमलाकर रामासावजी चवरे,
चवरे लाईन कारंजा (लाड),
ता.कारंजा, जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, अमरावती
२. जन माहिती अधिकारी,
मशिनरी विभाग, (कार्यशाळा विभाग),
महानगरपालिका, अमरावती
३.जन माहिती अधिकारी,
नगररचना विभाग, महानगरपालिका, अमरावती
४.जन माहिती अधिकारी,
अतिक्रमण विभाग, महानगरपालिका, अमरावती

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (कार्यशाळा) महानगरपालिका, अमरावती श्री.डि.बी. पडघन हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण पथकप्रमुख, महानगरपालिका, अमरावती श्री.जि.एच. जयस्वाल हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने मागितलेली माहिती ही एल ॲन्ड टी ५८० लोडर मशिन संबंधी आहे. सदरची मशिन अर्जदाराने ईसाखॉ हुसेन खॉ, महानगरपालिका, अमरावती यांचेकडुन विकत घेतली त्याआधी ईसाखॉ हुसेन खॉ, यांनी महानगरपालिका, अमरावती यांचेकडुन विकत घेतली त्यामुळे अर्जदाराला त्यासंबंधीची कागदपत्रे पाहिजे. सदरचे कागदपत्रे जे उपलब्ध आहे ते पुरविण्यात आली परंतु अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करण्याचे कारण माहिती बरोबर दिली नाही व खोटी असल्यासारखे वाटते असे म्हटले आहे. तरी, जी कागदपत्रे अर्जदाराला दिली त्याचे निरीक्षण अर्जदाराने मागितल्यास ते अर्जदाराला देण्यात यावे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे वरील बाबीची शहानिशा होऊ शकली नाही. तरी, अर्जदाराने लेखी विनंती जन माहिती अधिकारी यांचेकडे केल्यास अर्जदाराने मागितलेली कागदपत्राचे निरीक्षण मुळ अभिलेखावरुन तपासुन पहावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

अर्जदाराचा दिनांक ०८/१२/२०१० रोजी पुढिल तारीख मिळण्यासाठी पाठविलेला अर्ज हा ११.४५ वाजता प्राप्त झाला त्यामुळे त्याआधी अर्जदाराचे अपिल हे निकाली काढले होते. तरी, अर्जदाराला वरील दिलेल्या आदेशाची प्रत पाठविण्यात येत आहे व त्यानंतरही अर्जदाराचे मुळ अभिलेखाचे निरीक्षणानंतर काही तक्रार राहील्यास अर्जदार कलम १८ खाली हया आयोगाकडे तक्रार करु शकतात.

**(भास्कर पाटील)**

राज्य माहिती आयुक्त,

अमरावती खंडपीठ,

अमरावती

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२९६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री. इम्रान उल्ला खॉ, शफाकत उल्ला खॉ,
माळवीपुरा, पिंपळगांव राजा, ता. खामगांव,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलडाणा, जि.बुलडाणा.

२. जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य / मुख्याध्यापक, उर्दु हायस्कुल व ज्युनियर कॉलेज,
माळवीपुरा, पिंपळगांव राजा, (राजा एज्युकेशन व बहुउद्देशिय संस्था),
ता.खामगांव, जि. बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. इम्रान उल्ला खॉ, शफाकत उल्ला खॉ हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.व्ही.व्ही. नागरे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दु हायस्कुल व ज्युनियर कॉलेज, पिंपळगांव राजा श्री.औस दानिश खान हे हजर आहेत.

सदर प्रकरणांत अर्जदाराचा अर्ज प्रथम नाकारण्यात आला होता. त्यानंतर अर्जदाराने प्रपत्र 'ब' नुसार दिनांक १४/१२/२००९ ला प्रथम अपिल दाखल केले. त्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक ११/०२/२०१० रोजी प्रथम अपिलामध्ये निर्णय दिला व त्यात अतिवृष्टी मध्ये बरीच कागदपत्रे खराब झाली त्यामध्ये प्रस्ताव सुध्दा खराब झाला व त्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही. प्रथम अपिल दिनांक १४/१२/२००९ च्या अनुषंगाने कार्यालयाकडुन माहिती पुरविण्यात आली. तरी, हया संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी अर्जदाराला आवश्यक असलेले रेकॉर्ड मधील कुठल्या मुद्दयाचे रेकॉर्ड खराब झाले किंवा नाही याबाबत शहानिशा करुन शिक्षणाधिकारी यांचे समक्ष माहिती पुरवावी. परंतु त्याआधी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे चौकशी करुन व अर्जदाराचा माहिती अधिकारा खालील अर्ज त्यांचेकडे पाठवावा. सदरची प्रक्रिया ६ आठवडयाच्या आंत करण्यात यावी. गटशिक्षणाधिकारी यांनी चौकशी करुन अर्जदाराने मागितलेल्या ११ मुद्दयाची माहिती तपासुन पाहुन तशा प्रकारे प्रथम अपिलात सुनावणी ठेवावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधी दिलेला आदेश रद्द बातल करण्यात येतो व पुन्हा सुनावणी घेण्यात यावी. प्रथम अपिलातील पहिला आदेश दिनांक २१/१२/२००९ हा रद्दबातल करण्यात येते व त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२९४/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.शेखर कृष्णराव औगड,

मु.पो. धामोरी क. ता.भातकुली,
जि.अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा, जि.वर्धा.

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार (अ.का.)
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
उपविभाग वर्धा, जि.वर्धा.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.शेखर कृष्णराव औगड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वर्धा श्री.व्ही.एच. नागोसे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने त्यांचे अर्जावर तिकीट लावलेले नाही असे जन माहिती अधिकारी यांची तक्रार आहे. अर्जदाराने मुळ अर्ज हया आयोगासमोर दाखविला असता त्यावर तिकीट लावल्याचे दिसुन येत नाही. तरी, अर्जदाराने त्यांचे अर्जावर १० रु. चे तिकीट लावण्यात यावे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला १५ दिवसात माहिती पुरवावी. अर्जदाराला माहिती बरोबर मिळाली किंवा नाही याबाबत प्रथम अपिलामध्ये अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसात सुनावणी घेवुन नियमानुसार योग्य तो आदेश पारित करावा.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २९९/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.अभय मधुकर मुरखे,
१७ अ, तिरुपती कॉलनी, वडगांव रोड (मोठे),

जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रमुख कर्मचारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग),
महानगरपालिका, मुख्यालय, २ रा मजला, जुनी बिल्डींग
महानगरपालिका मार्ग, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,
विस्तारित इमारत, ६ वा मजला, महानगरपालिका मार्ग, मुंबई.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्रशासन), महानगरपालिका, मुंबई श्री. प्र.रा. सातपुते हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई श्रीमती सु.श. आपटे हया हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराचा दिनांक २८/०७/२००९ रोजीचा अर्ज दिनांक ०३/०८/२००९ रोजी प्राप्त झाला असुन सदर अर्जानुसार ३ मुद्दयांची माहिती मागितली होती. वास्तविक पाहता सदरची माहिती ही प्रश्नार्थक आहे व विलंबाबत कारण विचारले आहे. तरी, सुध्दा अर्जदाराला दिनांक २०/०८/२००९ ला माहिती पुरविण्यात आली त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने प्रपत्र घ्बङ अपिलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले व त्यात सुनावणी घेवुन माहिती देण्याबाबत आदेश दिला परंतु अर्जदार हे सुनावणीसाठी गैरहजर होते. तरी, त्यांना दिनांक १६/१०/०९ ला माहिती पुन्हा देण्यात आली. त्यानंतर अर्जदाराने दिनांक २१/१२/२००९ ला व्दितीय अपिल दाखल केले व आज व्दितीय अपिलाचे सुनावणीस सुध्दा अर्जदार गैरहजर आहेत. उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार अर्जदार हा १००% अपंग असल्यामुळे अर्जदाराचा नोकरी बद्दलचा विचार करण्यात आला नाही, हे कागदपत्रावरुन दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हा कोणत्याही कारणावरुन अर्ज करीत असतो. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे तीच माहिती उलटुनपालटुन पुन्हा पुन्हा मागितली. तरी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली आहे. अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती माहितीच्या अधिकारात बसत नसुन सुध्दा अर्जदाराला २ वेळेला माहिती पुरविण्यात आली.

अर्जदाराला माहिती मिळालेली असल्यामुळे आज रोजी अर्जदार गैरहजर राहिला असावे असा निष्कर्ष काढण्यात येवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**

**राज्य माहिती**

**आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ,**

**अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३०० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.आर.ए. वाघ,
स्टेट बँक कॉलनी, क्र.४/४, सावंतवाडी,
रणपिसे नगर, अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती,
इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय,
चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

२. जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे,
पीएमटी इमारत, कामगार न्यायालयाचे वर, पुणे.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे समाज कल्याण अधिकारी, (गट-ब), पुणे श्री.एस.व्हि. दिवशे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने ३ मुद्दयात माहिती मागितली व सदरची माहिती ही अजय रामभाऊ वाघ हे भटक्या जमाती 'ड' संवर्गातील असुन त्याने मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे येथे एम. एस. सी. बायोटेक जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षास प्रवेश घेतलेला आहे व त्याचा वार्षिक शैक्षणिक शुल्क आकारण्यात आहे. तो शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्तीस पात्र आहे किंवा नाही याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज आणलेली आहे. परंतु अर्जदार हे गैरहजर असल्यामुळे सदरची माहिती अर्जदाराला देता येवु शकली नाही. तरी, त्यांनी सदरची माहिती ३ दिवसाचे आंत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पाठवावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच हया आयोगासमोर दाखल केलेल्या उत्तराची प्रत सुध्दा अर्जदाराला पाठविण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३०१/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.महादेव किसनराव निमकर,
शिवाजी चौक, मु.पो. दारव्हा, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सचिव, श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, श्री.शिवाजी हायस्कुल,
मु.पो. दारव्हा, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.महादेव किसनराव निमकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ लिपीक, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती श्री.अनवर लतीफ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.शिवाजी हायस्कुल, दारव्हा श्री.दिलीप पांडुरंगजी पराते हे हजर आहेत.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी श्री.पराते यांचे म्हणण्यानुसार जी सेवा ज्येष्ठता यादी संस्था तयार करते त्या बाबतची माहिती त्यांच्या शाळेत उपलब्ध नाही. परंतु अर्जदाराला जी माहिती मिळाली ती संस्थेमार्फत पुरविण्यात आली. अर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदाराला ज्या सेवाज्येष्ठता यादया देण्यात आल्या त्या यादयांना जोडलेले मुखपत्र (कव्हरिंग लेटर) त्यामध्ये नाही. तरी, जन माहिती अधिकारी यांनी मुखपत्राची (कव्हरिंग लेटर) झेरॉक्स करुन ८ दिवसाचे आंत अर्जदाराला देण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३०३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
कु.प्रिती रमेश ईवनाते,
विजय नगर, गोपाल नगर जवळ,
अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे.

२. जन माहिती अधिकारी,

आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे.

**(आदेश पारीत दिनांक ०८/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी कु.प्रिती रमेश ईवनाते हया हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे श्री.एस.एम. तांबे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने प्रपत्र ‘अ’ नुसार जन माहिती अधिकारी तथा आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे यांचेकडे माहे मे २००९ बैठक क्रमांक ६१०६११०५३६, परिक्षा केंद्र क्रमांक इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रति मि. याबाबतची उत्तरपत्रिका मिळणेबाबत दिनांक ०९/०९/२००९ रोजी विनंती केली होती. परिक्षा मे २००९ ला घेण्यात आली होती त्यामुळे ३ महिन्याचा कालावधी नंतर सदरची उत्तरपत्रिका ही आदेश घेवुन नष्ट करण्यात आल्या आहेत.

वरील प्रकरणात वेगवेगळया ठिकाणी जरी हया बाबतचा निर्णय प्रलंबित असला तरी उत्तरपत्रिका नष्ट केल्यामुळे आदेश देवुनही अर्जदाराला माहिती मिळु शकत नाही. त्यामुळे अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**